**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२८ । शनिवार ६ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## सोयाबीन बियाण्याचा अपहार केलेला ट्रक एलसीबीकडून जप्त

### ३० लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीरामपूर येथून महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे भरून गेलेल्या आणि वाटेतच अपहार झालेल्या आयशर ट्रकचा शोध लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी १५ लाखांचा ट्रक आणि १५ लाख ३९ हजार ६४८ रुपयांचे बियाणे असा एकूण ३० लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २९ मे रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास दत्तनगर (श्रीरामपूर) येथील गजानन रोडवेज ट्रान्सपोर्टमधून सुनील भट्टड यांच्या मालकीचा आयशर ट्रक (एमएच १२ व्हीएफ ६९११) सोयाबीन बियाणे घेऊन निघाला होता. हा ट्रक चालक जयसिंग मुक्ताजी भगत (रा. खानापूर, जुन्नर, जि. पुणे) याच्याकडे विश्वासाने सोपवण्यात आला होता. मात्र, चालकाने मालासह ट्रक नियोजित ठिकाणी न नेता परस्पर दुसरीकडे नेऊन त्याचा अपहार केला. याप्रकरणी प्रदीप शिवनारायण भट्टड (रा. राहुरी) यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(४) नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आतार आणि विशाल तनपुरे यांचे विशेष पथक तयार केले. या पथकाने कौशल्यपूर्ण तपास करत गुप्त बातमीदाराच्या मदतीने माहिती मिळवली. हा अपहार केलेला ट्रक राजगुरुनगर (ता. खेड, जि. पुणे) येथील मार्केटयार्डमध्ये उभा असल्याची खात्रीशीर माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पथकाने तात्काळ तेथे जाऊन छापा टाकला आणि ट्रकसह सर्व बियाणे ताब्यात घेतले. जप्त केलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## विवेक कोल्हे यांच्यापाठोपाठ प्राजक्त तनपुरे यांचे भाजपकडून पुनर्वसन

### राहुरीत तनपुरेंच्या कार्यकर्त्यांमधील मरगळ दूर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी मतदारसंघाच्या राजकारणात गेल्या महिनाभरात अत्यंत वेगाने आणि महत्त्वपूर्ण घडामोडी घडून या मतदारसंघाला दोन आमदार लाभले आहेत. .विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे अक्षय शिवाजीराव कर्डिले हे नुकतेच निवडून आल्यानंतर आता त्यांच्यापाठोपाठ प्राजक्त तनपुरे यांचीही विधानपरिषदेचे आमदार म्हणून निवड झाली आहे. यामुळे राहुरी मतदारसंघाला एकाच महिन्यात दोन विधानपरिषद आमदार मिळाले असून, तालुक्याच्या राजकीय वर्तुळात नवा उत्साह संचारला आहे. कोपरगावमध्ये विवेक कोल्हे यांचे ज्याप्रमाणे ■ पान ४ वर

#### ऐनवेळी माघार आणि राजकीय पुनर्वसन

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत प्राजक्त तनपुरे हे अत्यंत तुल्यबळ आणि सक्षम उमेदवार मानले जात होते. मतदारसंघात त्यांची मोठी पकड असल्याने ही निवडणूक चुरशीची होईल, अशी चिन्हे होती. मात्र,वरिष्ठ पातळीवरील व्यूहरचनेचा भाग म्हणून तनपुरे यांनी ऐनवेळी निवडणुकीच्या रिंगणातून थांबण्याचा निर्णय घेतला. या राजकीय तडजोडीदरम्यान भाजप श्रेष्ठींनी तनपुरे यांना सन्मानजनक राजकीय पुनर्वसनाचा शब्द दिला होता. पक्षाने हा शब्द पाळत तनपुरे यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन अहिल्यानगर मतदारसंघाची विधानपरिषदेची आमदारकी बहाल केली. या निर्णयामुळे भाजप पक्षश्रेष्ठींनी तनपुरे यांच्यावर दाखवलेला विश्वास अधोरेखित झाला आहे.

#### राहुरीच्या विकासाला मिळणार गती

आमदार अक्षय कर्डिले आणि आमदार प्राजक्त तनपुरे हे दोन्ही नेते आता राहुरीचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या दोन्ही युवा आमदारांची जोडी राहुरी तालुक्याच्या प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. सिंचन, रस्ते, शेती आणि तरुणांच्या रोजगाराचे प्रश्न सोडवण्यासाठी ही दुहेरी ताकद महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

#### आमदार रोहित पवार राज्यात व्यस्त, मतदारसंघात आमदार शिंदेंचा वरचष्मा

प्राजक्त तनपुरे यांच्या विधानपरिषद निवडीमुळे भाजपचे जिल्ह्यातील आमदारांचे



संख्याबळ आता तीनवर पोहोचले असून, पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार हे राज्यपातळीवरील राजकारणात अधिक व्यस्त राहिल्याने, त्यांना स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची मजबूत बांधणी करता आलेली नाही, हे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट झाले. पवार अगदी काठावरच्या बहुमताने निवडून आले आहेत. दुसरीकडे, प्रा. राम शिंदे विधानपरिषदेवर आमदार असतानाही भाजपने त्यांच्यावर विश्वास दाखवत विधानसभेची उमेदवारी दिली होती. निवडणुकीतील पराभवानंतरही पक्षाने त्यांचा सन्मान राखत त्यांना विधानपरिषद सभापतीपदाची मोठी संधी दिली. परिणामी, मतदारसंघात प्रा. राम शिंदे गटाचा वरचष्मा निर्माण झाला असून, नुकत्याच पार पडलेल्या नगरपंचायत निवडणुकीत भाजपच्या या वाढत्या प्रभावाचे स्पष्ट प्रत्यंतर पाहायला मिळाले आहे.

## काळे-कोल्हे संघर्षात कोल्हे गटाचा पुनर्जन्म



कोपरगाव तालुक्याच्या राजकारणात काळे आणि कोल्हे या दोन पारंपरिक राजकीय घराण्यांचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे. अनेक वर्षांपासून आलटून-पालटून कोपरगाव विधानसभा मतदारसंघाची सत्ता याच दोन घराण्यांभोवती फिरत राहिली. स्व. शंकरराव काळे आणि स्व. शंकरराव कोल्हे या दोन्ही शंकररावांनी आपापल्या कार्यकाळात राज्यात कोपरगावचा एक वेगळा दबदबा निर्माण केला होता. आज या दोन्ही नेत्यांची तिसरी पिढी राजकारणात सक्रिय आहे. सध्या आमदार आशुतोष काळे हे सलग दुसऱ्यांदा ■ पान ४ वर

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य समाजाला प्रेरणा, ऊर्जा देणारे – महापौर ज्योतीताई गाडे

### छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा
### महापालिकेच्या वतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करून स्वराज्याच्या आदर्शांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महापौर ज्योतीताई गाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय असे रयतेचे राज्य निर्माण केले. समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे, महिलांचा सन्मान राखणे, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला न्याय देणे तसेच सर्व ■ पान ४ वर

## नगरचे ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांचे निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरचे ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण गोपाळ देशमुख (वय ६३) यांचे आज शनिवारी (६ जून) दुपारी सव्वा दोनच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या निधनाने नगरचा सांस्कृतिक व ऐतिहासिक कोष हरपला आहे. सायंकाळी साडे सहाच्या सुमारास अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पत्रकारिता, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील अनेकजण उपस्थित होते. त्यांच्या मागे ९० वर्षांची आई श्रीमती कुमुदिनी गोपाळ देशमुख, पत्नी ज्योती भूषण देशमुख, मुलगा मोहित भूषण देशमुख, सून ऋतुजा मोहित देशमुख यांच्यासह दोन बहिणी संगीता विळदकर (नाशिक) व सुलभा चिंचोरे (पुणे) असा परिवार आहे. नगरमधील स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी त्यांचे ते मावस भाऊ होत.



नगरच्या भुईकोट किल्ला परिसरात पर्यटकांना किल्ल्याची ऐतिहासिक माहिती देत असताना भूषण देशमुख यांना सर्पदंश झाला होता. येथील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर ■ पान ४ वर

## पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेतील दिरंगाई!

### आमदार दातेंनी घेतली गंभीर दखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा येथील रमेश बाबासाहेब शेळके यांच्या निधनानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. मात्र तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेस होत असलेल्या विलंबामुळे नातेवाईकांसह उपस्थित नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

■ पान ४ वर



पारनेर ग्रामीण रुग्णालय पोहोचल्यानंतर उपस्थित नातेवाईक व नागरिकांशी संवाद साधून त्यांची व्यथा जाणून घेतली, त्यानंतर पारनेर ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सतीश लोंढे यांना शवविच्छेदन करण्यात विलंब झाल्याबद्दल जाब विचारला, जिल्ह्याचे शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी दूरध्वनीवरून त्वरित संपर्क साधत संबंधित शवविच्छेदन प्रक्रिया कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागणे ही गंभीर बाब असून, आपल्या कर्तव्यात कुचराई करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचनाही दिल्या.

**आ. काशिनाथ दाते सर**
(विधानसभा सदस्य)

# गोदावरी महामंडळ कार्यालय स्थलांतराचा विखेंचा ‘बालहट्ट’

### निर्णय मागे घेतला नाही तर संघर्ष अटळ । खासदार नीलेश लंके यांचा पत्रकार परिषदेत इशारा । शासनाची मंजुरी नसताना कार्यालये हलविण्याचा निर्णय । दक्षिण नगरच्या सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचे आवाहन


**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील महत्त्वाच्या विभागीय कार्यालयांचे अहिल्यानगरमधून लोणी येथे स्थलांतर करण्याचा निर्णय हा शासनाची कोणतीही पूर्वमान्यता न घेता घेतलेला असून तो पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा ‘बालहट्ट’ असल्याची घणाघाती टीका खासदार नीलेश लंके यांनी केली. हा निर्णय तातडीने मागे घेण्यात आला नाही तर शेतकरी, कर्मचारी आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अहिल्यानगर येथे शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खासदार लंके यांनी गोदावरी खोरे महामंडळाच्या कार्यालय स्थलांतराच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक योगीराज गाडे, अशोक बाबर आदी उपस्थित होते.

कार्यालय स्थलांतरामागे वेगळाच हेतू असल्याची शंका उपस्थित करताना लंके म्हणाले, की कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाची कार्यालये लोणी येथे हलविण्याचा घाट घातला जात आहे. जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गोदावरी व कृष्णा सिंचन विकास महामंडळांचा कारभार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आहे. सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळांवर शासनाचे नियंत्रण असताना शासनाला विश्वासात न घेता स्थलांतराचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

ते म्हणाले, ज्या ठिकाणी कार्यालये हलविण्याचा प्रस्ताव आहे, तेथे स्वतंत्र प्रशासकीय इमारत नाही, कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था नाही आणि आवश्यक पायाभूत सुविधांचाही अभाव आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या हिताचा नसून त्यामागे काही वेगळाच हेतू असल्याची शंका निर्माण होते. श्रीरामपूरमध्ये जसे काही प्रकार घडले, त्याच धर्तीवर या जागा एखाद्या खाजगी संस्थेला देण्याचा डाव तर नाही ना, असा प्रश्न निर्माण होत आहे.



या संपूर्ण प्रकरणाची माहिती राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे दिली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थलांतर प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी आपण केली असल्याचे लंके यांनी सांगितले. निर्णय कायम ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र संघर्ष उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९३० पासून जिल्हा मुख्यालयात कार्यरत आहे, तर मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९५२ पासून येथेच कार्यरत आहे. या कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी आणि पारनेर या तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी जिल्हा मुख्यालयातील ही कार्यालये अधिक सोयीची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कोणतीही लोकमागणी नसताना तब्बल नऊ दशकांची प्रशासकीय परंपरा असलेली कार्यालये हलविण्याचा हट्ट का धरला जात आहे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सांगितले की, स्थलांतरामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागेल, वेळ आणि पैशांचा अपव्यय होईल तसेच शेतकऱ्यांच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होतील.

यापुढेही अशाच प्रकारे शासकीय कार्यालये हलविण्याचे प्रयत्न होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करताना लंके म्हणाले, आज पाटबंधारे विभागाची कार्यालये हलविली जात आहेत. उद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद किंवा इतर महत्त्वाची शासकीय कार्यालयेही स्थलांतरित करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन याला विरोध करणे आवश्यक आहे.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुद्द्यावरूनही त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. नगरसाठी मंजूर झालेले वैद्यकीय महाविद्यालय अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र केंद्रीय समितीसमोर ठाम भूमिका मांडल्यामुळे ते नगरमध्येच राहिले, असा दावा त्यांनी केला.

जिल्ह्याच्या विकासासाठी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात वृक्षारोपणाने जागतिक पर्यावरण दिन साजरा

अहिल्यानगर - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात भारतीय लहुजी सेनेच्या वतीने



वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित भविष्यासाठी समाजात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील सकट आणि भटक्या विमुक्त समाज संघटनेचे शहराध्यक्ष राजाभाऊ वाडेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रशांत मस्तूद, सचिन घुमरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणाचे वाढते प्रश्न, तापमानवाढ, प्रदूषण आणि जंगलतोड याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.सुनील सकट म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल ही चिंतेची बाब आहे. वृक्ष हे केवळ ऑक्सिजनचे स्रोत नसून संपूर्ण सजीव सृष्टीचे जीवनाधार आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारून वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.राजाभाऊ वाडेकर म्हणाले की, आजची पिढी आणि उद्याचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपणासोबतच प्लास्टिकमुक्ती, पाणी संवर्धन आणि स्वच्छतेच्या उपक्रमांवर भर देणे आवश्यक आहे. विशेष मुलांच्या शाळेत पर्यावरण दिन साजरा करण्यामागे त्यांच्यामध्येही निसर्गप्रेम आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### बेकायदेशीर सावकारी, जमीन बळकावण्याचा प्रयत्न

अहिल्यानगर - नागरदेवळे (ता. नगर) येथील ७५ वर्षीय ज्येष्ठ महिला द्वारकाबाई अंजाबापू दळवी यांनी बेकायदेशीर सावकारी, फसवणूक, दबाव टाकून जमीन बळकावण्याचा प्रयत्न तसेच सहकार विभागाच्या कथित निष्क्रियतेबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकार आयुक्त यांच्याकडे तक्रार अर्ज देऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. द्वारकाबाई दळवी यांच्या मालकीच्या चिचोंडी पाटील (ता. नगर) येथील सुमारे ३६ गुंठे जमिनीबाबत संशयास्पद व्यवहार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात बेकायदेशीर सावकारी व्यवहार, दबाव, फसवणूक आणि जमीन हस्तगत करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा अर्जामध्ये करण्यात आला आहे. यापूर्वी विविध शासकीय कार्यालयांकडे हरकती व निवेदने सादर करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.तसेच संबंधित व्यक्तीवर सहकार विभागाने टाकलेल्या धाडीत रोख व्यवहारांच्या नोंदी, चेकबुक, तारण कागदपत्रे, खरेदीखतांच्या प्रती आणि इतर संशयास्पद दस्तऐवज जप्त झाल्याचा उल्लेख अर्जात करण्यात आला आहे. या जप्त साहित्याची फॉरेन्सिक तपासणी करून निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# एआयच्या गाण्यांमधून जनगणनेची जनजागृती

## डॉ.अमोल बागुल यांच्या गीतांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार जनगणना २०२७ च्या जनजागृती मोहिमेला नवे आणि आधुनिक स्वरूप देत प्रगणक तथा जनगणना ब्रँड अँबेसिडर कवी डॉ. अमोल बागुल यांनी मराठी भाषेत जनगणनेवरील प्रेरणादायी गीतांचे लेखन करत कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि चॅट जीपीटीच्या सहाय्याने या गीतांना सुरेल संगीत, आकर्षक ताल, लय आणि आधुनिक ध्वनिमुद्रणाची जोड देऊन गाणी तयार केली आहेत.

''आले जनगणनेचे पर्व, सज्ज अहिल्यानगर सर्व'', ''स्वगणना करूया चला'', ''पावसातली जनगणना'' यांसारख्या गीतांसह सुमारे १० गाणी तयार करण्यात आली असून जनगणनेचा संदेश घराघरांत पोहोचविण्यासाठी विशेष रिंगटोन, जिंगल्स आणि ऑडिओ संदेश देखील विकसित केले आहेत,ही गाणी विविध रेडिओ चॅनेल, एफएम केंद्रे तसेच सोशल मीडियावरील विविध प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या गीतांच्या किंवा आर कोड विमोचनाप्रसंगी आयुक्त श्री डांगे यांनी नमूद केले की '' संगीताच्या माध्यमातून जनगणनेचा संदेश प्रभावीपणे पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये जनगणनेविषयी जागरूकता वाढत आहे.परिणामी, प्रगणकांना अचूक माहिती संकलित करण्यासाठी अधिक सहकार्य मिळत असल्याचे दिसून येत आहे.''जनगणना जनजागृतीसाठी तंत्रज्ञान, साहित्य आणि संगीत यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम राज्यात आदर्शवत ठरत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यासाठी डॉ.बागुल यांना नागेंद्र मुतकेकर (अतिरिक्त आयुक्त),मेहेर लहारे( सहाय्यक आयुक्त), शहाजान तडवी- (प्र.उपायुक्त),राकेश कोतकर( जनगणना विभाग प्रमुख) तसेच बाळासाहेब पवार (प्रभाग अधिकारी),रफिक देशमुख,मास्टर ट्रेनर प्रा.संतोष देशमुख,पर्यवेक्षिका अलका दहातोंडे, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.या गाण्यांची लिंक ९५९५५४५५५५ या व्हाट्सअप क्रमांकावर मिळू शकेल.

# कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाशी नाते जोडा

## स्नेहबंधचे प्लास्टिकमुक्ती अभियान । मान्यवरांच्या हस्ते अभियानाच्या पोस्टरचे अनावरण; नागरिकांना प्लास्टिकमुक्तीचा संदेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ''स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक अहिल्यानगर घडविण्यासाठी प्रत्येकाने प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करावा,'' असे आवाहन डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. प्लास्टिकमुक्ती अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धन आणि प्लास्टिकमुक्त समाज निर्मितीच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने 'कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाशी नाते जोडा' या संदेशाखाली प्लास्टिकमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या पोस्टरचे अनावरण पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, आमदार संग्राम जगताप, महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उद्योजक अमोल गाडे, तसेच छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी प्लास्टिकमुक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरण, मानव आणि प्राणीजीवनासाठी धोकादायक ठरत आहे. प्लास्टिकमुळे माती, पाणी व हवेचे प्रदूषण वाढत असून पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी किंवा पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

## ग्रामीण कृषि कार्यानुभव उपक्रमाचे अभ्यास दौऱ्यानिमित्ताने कृषीकन्यांचे वंजारवाडी येथे ग्रामस्थांकडून स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी संलग्नित सद्गुरु कृषी महाविद्यालय, मिरजगाव ता.कर्जत, जि.अहिल्यानगर च्या कृषी कन्या राजश्री भोईटे,ईश्वरी भुजबळ,अंकिता गोफणे, वेदांतिका खरात,वैष्णवी बंडगर,स्नेहल गजरमल,प्रतीक्षा आटोळे यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्नता उपक्रम २०२६-२७ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने जामखेड तालुक्यातील वंजारवाडी या गावामध्ये आगमन झाले.

ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नता उपक्रम चतुर्थ वर्षाच्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग असून,यात विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, सामाजिक आर्थिक परिस्थितीची आणि शेतीशी संबंधित समस्यांची प्रत्यक्ष माहिती व्हावी.त्यासाठी या कार्यक्रमांतर्गत पुढील तीन महिने या विद्यार्थिनी गावांमध्ये मुक्कामी राहून अभ्यास दौरा करणार आहे.

वंजारवाडी येथील ग्रामस्थांनी कृषी कन्यांचे स्वागत केले. त्यांच्या स्वागतावेळी गावचे सरपंच कोमल जायभाय , उपसरपंच हरी आढाव तसेच रमेश जायभाय,भागवत जायभाय,विष्णू जायभाय इतर ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी कृषीकन्या शेतकऱ्यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामाप्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी, कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देतील. तसेच माती परीक्षण,पाणी व्यवस्थापन,कीड रोग पीक संरक्षण,इतर कृषी संबंधित प्रात्यक्षिके कृषिकन्या मार्फत घेतली जातील.तसेच शेतकऱ्यांसाठी विविध कृषी विषयक कार्यक्रम राबवणार आहेत.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शंकर नेवसे,अध्यक्षा सौ. कल्याणीताई नेवसे,सचिव राजेंद्र गोरे,प्रशासकीय अधिकारी सखाराम राजळे, समन्वयक श्री राहुल म्हेत्रे, प्राचार्य डॉ.रामदास बिटे, कार्यक्रम समन्वयक प्रा.चांगदेव माने,कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## बाळनाथ गडाचे उत्तराधिकारी आदिनाथ मालुसरे यांचा मंगळवार ९ जुन रोजी पदवी प्रदान समारंभ संपन्न होणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील श्री क्षेत्र बाळनाथ गड येथे मंगळवार दिनांक ९ जून २०२६ रोजी हभप चि.धर्मनाथ आदिनाथ मालुसरे महाराज यांचा संतचरणरज श्री.छगन महाराज मालुसरे यांच्या आशीर्वादाने श्री.क्षेत्र बाळनाथ गड उत्तराधिकारी म्हणून पदवी प्रदान समारंभ संपन्न होत आहे.

या समारंभ निमित्त सकाळी ७ वा. चैतन्य बाळ नाथांचा अभिषेक होऊन सकाळी ८ वा. विष्णू याग व दीक्षा समारंभ होईल.याचे पौराहित्य हभप प्रसाद महाराज देव करणार आहेत. सकाळी ९ ते ११ या वेळेत डॉ.विकास महाराज मिसाळ यांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यानंतर उत्तराधिकारी पदवी प्रदान समारंभ संपन्न होईल. अशी माहिती हभप आदिनाथ छगन महाराज मालुसरे यांनी दिली.



या धार्मिक सोहळ्यासाठी अहिल्यानगरचे खा.निलेश लंके, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप, आ.विक्रम पाचपुते, आ.अक्षय कर्डिले, आ.मोनिकाताई राजळे उपस्थित राहणार आहेत.तरी पंचक्रोशीतील बाळनाथ गडाच्या सेवेत असणारे मान्यवर व्यक्ती, भाविकांनी या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन वारकरी संप्रदायाच्या वतीने प्रदेश उपाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी केले आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी विलास भुमरे बिनविरोध

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** तालुक्याचे आमदार विलास पाटील भुमरे यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे पैठण तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते व समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभव, शेतकरी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत असलेली बांधिलकी आणि विकासाभिमुख कार्यशैली यामुळे भुमरे यांची संचालकपदी निवड महत्त्वाची मानली जात आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भुमरे यांच्या बिनविरोध निवडीबद्दल विविध राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील कार्यकाळात बँकेची प्रगती आणि सहकार क्षेत्र अधिक सक्षम होण्यासाठी ते प्रभावी योगदान देतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या निवडीमुळे पैठण तालुक्याच्या राजकीय व सहकार क्षेत्रातील नेतृत्वाला आणखी बळ मिळाल्याची प्रतिक्रिया समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

# जलजीवन मिशनच्या ४ कोटींच्या योजनेत गैरव्यवहाराचा आरोप

## मौजे धोत्रे बुद्रुक येथील निकृष्ट कामांची चौकशी करण्याची मागणी; कोट्यवधींची बिले काढूनही ग्रामस्थांना पाणी नाही । ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत जागरण गोंधळ व ठिय्या आंदोलनाचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील मौजे धोत्रे बु. येथील जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत या कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच संबंधित ठेकेदारांची ब्लॅकलिस्ट करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशीही मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे. यासंदर्भात आठ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालय, धोत्रे बु. समोर बेमुदत जागरण गोंधळ व ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

समितीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वी भारत निर्माण पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे २ कोटी १४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र या योजनेची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आली. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे दाखवत संपूर्ण बिले काढून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्यक्षात योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न झाल्याने ग्रामस्थांच्या पाणीटंचाईची समस्या कायम असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

त्यानंतर धोत्रे बु. व धोत्रे खुर्द या गावांसाठी जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ४ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. मात्र या योजनेची अंमलबजावणी करतानाही शासन नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप समितीने केला आहे. कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचा वापर करण्यात आला असून अनेक ठिकाणी पाइपलाइन व पाण्याच्या टाक्यांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे सांगण्यात आले आहे.

धोत्रे परिसरात मोठ्या प्रमाणावर मेंढपाळ व शेतकरी समाज वास्तव्यास असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. जलजीवन मिशनची 'हर घर जल' ही संकल्पना असतानाही अनेक घरांपर्यंत अद्याप शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचले नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्यानंतरही नागरिकांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, संबंधित योजनेची कामे पूर्ण न होता केवळ आर्थिक लाभासाठी बिले काढून घेण्यात आली. शासनाच्या निधीचा योग्य वापर न करता योजना कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करून आजपर्यंत झालेल्या सर्व कामांची शासन निर्णयानुसार पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

भारत निर्माण योजनेसाठी २ कोटी १४ लाख रुपये आणि जलजीवन मिशनसाठी ४ कोटी रुपये असा मोठा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असतानाही ग्रामस्थांच्या पाण्याच्या समस्या कायम आहेत. त्यामुळे या योजनांचा लाभ ग्रामस्थांसाठी झाला की केवळ ठेकेदारांच्या आर्थिक हितासाठी, असा प्रश्न उपस्थित होत असल्याचे समितीने म्हटले आहे. संबंधित ठेकेदारांना तात्काळ ब्लॅकलिस्ट करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत व संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अन्यथा अनेक सामाजिक संघटना आणि ग्रामस्थांच्या सहभागातून ग्रामपंचायत कार्यालय, धोत्रे बु. समोर बेमुदत जागरण गोंधळ व ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### मुकुंदनगरच्या रहिवासी भागातील अनधिकृत मंगलकार्यालयामुळे नागरिक त्रस्त

अहिल्यानगर- शहरातील मुकुंदनगर परिसरातील सहारा सिटी येथे रहिवासी भागात उभारण्यात आलेल्या कथित अनधिकृत मंगलकार्यालयामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत संबंधित मंगलकार्यालयाचा परवाना रद्द करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सय्यद हाफिजद्दीन सय्यद राजा यांनी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त तसेच सहायक संचालक तथा नगररचना विभाग प्रमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, सर्वे नं. ३३३/१/२/३३४/१/२ येथील सहारा सिटी हा परिसर महानगरपालिका हद्दीतील प्रामुख्याने रहिवासी भाग आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले वास्तव्यास आहेत. शासनाच्या नियमानुसार अशा ठिकाणी राखीव ॲमिनिटी क्षेत्राचा वापर बालकांसाठी खेळाचे मैदान, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य व मार्गदर्शन केंद्र, महिला सक्षमीकरण उपक्रम तसेच सामाजिक उपक्रमांसाठी करण्यात यावा, असा उद्देश असल्याचे तक्रारदारांनी नमूद केले आहे.मात्र, या ॲमिनिटी क्षेत्रात नूर मोहम्मद अबीद शेख यांनी व्यावसायिक हेतूने मंगलकार्यालय उभारल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या मंगलकार्यालयासाठी आवश्यक असलेल्या पार्किंग सुविधेचा अभाव असल्याने कार्यक्रमांना येणाऱ्या पाहुण्यांची वाहने मुख्य रस्त्यावर उभी केली जातात. परिणामी परिसरात वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून रहिवाशांना दैनंदिन ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.तसेच रस्त्यावर उभी करण्यात आलेली वाहने हटविण्याची विनंती केल्यास संबंधितांकडून नागरिकांना शिवीगाळ, दमदाटी व त्रास दिला जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

### सलून सेवांच्या दरात २० टक्के दरवाढीचा निर्णय

अहिल्यानगर- केस कापणारा, दाढी करणारा, लग्नसमारंभापासून ते प्रत्येक शुभकार्यामध्ये समाजाचा अविभाज्य भाग असलेला नाभिक समाज आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. ग्राहकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा सलून व्यवसाय गेल्या काही वर्षांत वाढती महागाई, आर्थिक मंदी आणि वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली अक्षरशः दबला गेला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरामध्ये २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, ही दरवाढ ६ जून २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. हा निर्णय केवळ दरवाढ नसून, राज्यातील हजारो सलून व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न असल्याचे नाभिक महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी स्पष्ट केले.गेल्या काही महिन्यांपासून जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह छोट्या व्यावसायिकांनाही बसत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे इंधन दरात झालेली वाढ आता प्रत्येक वस्तू आणि सेवेमध्ये दिसून येत आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तू महाग झाली आहे. सलून व्यवसायासाठी लागणारे शॅम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल क्रीम, जेल, वॅक्स, डिस्पोजेबल वस्तू, टॉवेल धुण्याचे साहित्य, निर्जंतुकीकरणासाठी लागणारे पदार्थ आणि इतर अनेक वस्तू पेट्रो-केमिकल उद्योगाशी संबंधित आहेत. त्यामुळे इंधन दरवाढीचा थेट परिणाम या वस्तूंवर झाला आहे. लॉरियल, वेला, श्वार्झकॉफ, गोदरेज यांसारख्या नामांकित देशी-विदेशी कंपन्यांनी गेल्या काही काळात त्यांच्या उत्पादनांच्या किंमतींमध्ये मोठी वाढ केली आहे. मात्र ग्राहकांना परवडावे म्हणून अनेक सलून व्यावसायिकांनी स्वतःचा नफा कमी करून सेवा सुरू ठेवल्या. पण आता परिस्थिती अशी झाली आहे की, जुने दर ठेवून व्यवसाय चालवणे अशक्य झाले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जैन श्रावक संघ, विनायक नगर येथे वृक्षारोपण

### समाजाचे देणे फेडण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लावून त्याचे संवर्धन करावे - माजी उपमहापौर गणेश भोसले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना निरोगी व समृद्ध निसर्ग देण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे काळाची गरज आहे. समाजाप्रती आपले काहीतरी देणे लागते, या भावनेतून प्रत्येक नागरिकाने सामाजिक बांधिलकी जपत सकारात्मक दृष्टिकोनातून वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे कर्तव्य पार पाडले पाहिजे, असे प्रतिपादन महानगरपालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जैन श्रावक संघ, विनायक नगर यांच्या वतीने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजेंद्र भंडारी, किशोर श्रीश्रीमाळ, दिलीप पटवा, राजेंद्र गुगळे, संदीप घोडके, मुरलीधर वाघमारे, डॉ. अभय मुथा, राजेंद्र गांधी, नितीन शेलोत, कांतीलाल कटारिया, प्रकाश बलदोटा, अनिल कदम, योगेश मुथा, हिरालाल पटवा, पारस गुंदेचा, सुभाष गुंदेचा, डॉ. अरविंद गुगळे, वैभव फिरोदिया, मनसुखलाल भंडारी, अमृत कटारिया, शरद सुरपूरीया, रसिक बोरा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गणेश भोसले म्हणाले की, गेल्या वीस वर्षांपासून प्रभागात 'स्वच्छ, सुंदर, हरित प्रभाग' ही संकल्पना राबविण्यात येत असून नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे त्याला मोठे यश मिळाले आहे. दरवर्षी पावसाळ्यात किमान शंभर झाडांची लागवड करून त्यांचे संवर्धन केले जाते. केवळ झाडे लावून थांबून चालणार नाही, तर ती जगविण्याची जबाबदारीही स्वीकारावी लागते. शासन वृक्षलागवडीसाठी हजारो कोटी रुपये खर्च करते; मात्र संवर्धनाच्या अभावामुळे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत.

ते पुढे म्हणाले की, आज शहरात सर्वाधिक वृक्ष असलेला प्रभाग म्हणून या परिसराची ओळख निर्माण झाली आहे. वृक्षांमुळे केवळ पर्यावरणाचे संरक्षण होत नाही, तर परिसराचे सौंदर्य वाढते, तापमान नियंत्रणात राहते आणि पक्षी-प्राण्यांनाही सुरक्षित अधिवास मिळतो. यासोबतच प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. स्वच्छता आणि हरितीकरण या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे राबवल्यासच आदर्श प्रभाग घडू शकतो.

राजेंद्र भंडारी यांनी यावेळी सांगितले की, प्रभागाचे नगरसेवक म्हणून गणेश भोसले यांनी अनेक वर्षांपासून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची प्रभावी लोकचळवळ उभी केली आहे. या उपक्रमात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असून वृक्षांचे जतन करण्यासाठीही पुढाकार घेत आहेत. त्यांनी लावलेल्या 'बकुळ' वृक्षांवर मोठ्या प्रमाणात पक्षी येतात, त्यामुळे नागरिकांना निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्याची संधी मिळते. वृक्षांमुळे परिसरात प्रसन्न वातावरण निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कुलकर्णी कुटुंबावर जीवघेणा हल्ल्याचा संशय? सलग दुसऱ्या दिवशीही थरार

### दोन कार जाळून खाक केल्यानंतर दुचाकी पेटवण्याचा प्रयत्न । फुटेजमध्ये ३ संशयित कैद; आमदार संग्राम जगताप यांची घटनास्थळी पाहणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील शनी चौक परिसरातील गुजर गल्लीमध्ये सलग दुसऱ्या दिवशी घडलेल्या धक्कादायक घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल मध्यरात्री गौरव विनायक कुलकर्णी यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या दोन आलिशान कारना आग लावून त्या पूर्णतः जाळून खाक करण्यात आल्या होत्या. या घटनेची धग अद्याप कायम असतानाच आज पुन्हा त्यांच्या दुचाकीला आग लावण्याचा प्रयत्न झाल्याने हा प्रकार अपघाती नसून पूर्वनियोजित घातपात असल्याचा संशय अधिक बळावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास गौरव कुलकर्णी यांच्या घरासमोर पार्क केलेल्या महिंद्रा ५०० आणि ह्युंदाई एक्स्टर या दोन चारचाकी वाहनांना आग लावण्यात आली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत दोन्ही वाहने पूर्णतः जळून खाक झाली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

दरम्यान, आज पुन्हा मध्यरात्री त्यांच्या दुचाकीला आग लावण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. या सलग घडणाऱ्या घटनांमुळे कुलकर्णी कुटुंबीयांसह संपूर्ण परिसरात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे या घटनेचे फुटेज समोर आले असून त्यामध्ये तीन संशयित व्यक्ती वाहनांच्या परिसरात संशयास्पद हालचाली करताना स्पष्टपणे दिसत आहेत. त्यामुळे हा प्रकार नियोजनबद्ध कटाचा भाग असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

घटनेची गंभीर दखल घेत आमदार संग्राम जगताप यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी कुलकर्णी कुटुंबीयांची भेट घेत त्यांना धीर दिला तसेच पोलीस प्रशासनाशी चर्चा करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''अशा प्रकारच्या घटना घडविणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तीला वेळीच ठेचले पाहिजे. नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. फुटेजमध्ये दिसणाऱ्या संशयित आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांना अटक करण्यात यावी. अशा घटनांमधून भविष्यात एखादा मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे.या प्रकरणाचा तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून पोलीस पथक संशयितांच्या शोधासाठी युद्धपातळीवर काम करत आहे. परिसरातील सर्व फुटेजची तपासणी करण्यात येत असून आरोपींच्या हालचालींचा मागोवा घेतला जात आहे.सलग दोन दिवस घडलेल्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी मागणी केली.

## धोत्रे बु॥वि.का.सह.सोसायटीच्या व्हा.चेअरमनपदी रविंद्रकुमार सबाजी भांड यांची बिनविरोध निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धोत्रे बु॥वि.का.सेवा सह.सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी विशेष सभा श्रीमती शुभांगी सराफ मॅडम सहकार अधिकारी श्रेणी २ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने रविंद्रकुमार सबाजी भांड यांचा एकमेव अर्ज सभेस प्राप्त झाला सूचक म्हणून श्री रभाजी बबन भांड व अनुमोदक विजय लहानु रोडे यांनी दिले.व्हा.चेअरमन पदासाठी एकमेव अर्ज आल्यामुळे सभेचे अध्यक्ष श्रीमती शुभांगी सराफ मॅडम यांनी व्हा.चेअरमन म्हणून श्री.रविंद्रकुमार सबाजी भांड यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

सोसायटीच्या विशेष सभेसाठी सोसायटीचे चेअरमन रभाजी भांड,संचालक हारकू भिटे विजय रोडे,दिपक भागवत,नंदकुमार राहिंज, रविंद्रकुमार भांड,सखाराम रोडे,भास्कर कुटे,सदानंद रोकडे उपस्थित होते. सोसायटीचे सचिव आर.के.भांड भाऊसाहेब यांनी निवड प्रक्रियासाठी विशेष सहकार्य केले. नुतन व्हा.चेअरमन यांचा सर्व संचालक तसेच राजू रोडे,राजू भांड,रामदास रोडे बाळासाहेब नाईकवाडी,संतोष पाचारणे, तसेच सर्व मित्र परिवाराने व्हा.चेअरमन यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## उन्हाळ्यात जांभूळ ठरते आरोग्याची संजीवनी; चवदार फळासोबत अनेक औषधी गुणधर्म

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** उन्हाळ्याच्या दिवसांत बाजारपेठेत आणि ग्रामीण भागात जांभळांचा हंगाम सुरू झाला आहे. गोड-आंबट चवीमुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडणारे जांभूळ हे फळ केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक मानले जाते. आयुर्वेदात जांभळाला विशेष महत्त्व असून त्याचे फळ, बिया आणि पानेही विविध औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहेत.

जांभळामध्ये व्हिटॅमिन सी, लोह, कॅल्शियम, पोटॅशियम आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. उन्हाळ्यात होणारी शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठीही जांभूळ उपयुक्त ठरते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी जांभूळ विशेष फायदेशीर मानले जाते. जांभळाच्या



बियांपासून तयार केलेली पावडर रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करते, असे तज्ज्ञ सांगतात. तसेच पचनक्रिया सुधारण्यासाठी, पोटाचे विकार कमी करण्यासाठी आणि भूक वाढविण्यासाठीही जांभळाचा उपयोग होतो.

जांभळातील अँटिऑक्सिडंट्स त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. रक्तशुद्धीकरणासह हृदयाच्या आरोग्यासाठीही हे फळ लाभदायक आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला व शेतांमध्ये जांभळाची झाडे फळांनी बहरलेली दिसत असून नागरिक मोठ्या प्रमाणात जांभूळ खरेदी करत आहेत.

आरोग्यदायी गुणधर्मांनी परिपूर्ण असलेले जांभूळ हे उन्हाळ्यातील नैसर्गिक वरदान मानले जात असून नागरिकांनी हंगामात या फळाचा आहारात समावेश करावा, असे आवाहन आरोग्य तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. जांभूळ खाण्याचे प्रमुख फायदे रोगप्रतिकारक शक्ती वाढते रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत.

## सीजी पॉवरच्या अति-उच्च दाबाच्या स्विचगिअर निर्मिती प्रकल्पाच्या कामकाजास नाशिकमध्ये सुरुवात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इंजिनीअरिंग क्षेत्रातील एक प्रमुख समूह आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग उद्योगातील अग्रेसर कंपनी असलेल्या सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेडने नाशिक, महाराष्ट्र येथील पिंपळगाव गरुडेश्वर येथे आपल्या एक्स्ट्रा हाय-व्होल्टेज (ईएचव्ही) स्विचगिअर उत्पादन प्रकल्पाचे (एस३ युनिट-) कामकाज सुरू केल्याची घोषणा आज केली. नाशिकमधील अंबड येथील एस३ युनिट- या उत्पादन प्रकल्पाव्यतिरिक्त हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे; या एस३ युनिट- मध्ये ३३ केव्ही (केव्ही) ते ८०० केव्ही (केव्ही) क्षमतेच्या ईएचव्ही सर्किट ब्रेकर्सचे उत्पादन केले जाते.

या नवीन प्रकल्पामध्ये ३३ केव्ही ते २४५ केव्ही श्रेणीतील ईएचव्ही सर्किट ब्रेकर्सचे उत्पादन केले जाईल आणि यामुळे सीजीच्या ईएचव्ही सर्किट ब्रेकर उत्पादन क्षमतेत ८०% वाढ होईल. ५०० केव्ही आणि ३५० केव्ही च्या उच्च-व्होल्टेज चाचणी प्रयोगशाळांसह प्रगत उत्पादन आणि चाचणी सुविधांनी सज्ज असलेला हा प्रकल्प, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील विश्वसनीय वीज पारेषण उपकरणांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उभारण्यात आला आहे.

या सुविधेमुळे युटिलिटीज, रेल्वे, नवीकरणीय ऊर्जा, तेल आणि वायू, आणि पारेषण पायाभूत सुविधा प्रकल्प यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांना सेवा देण्याची सीजीची क्षमता बळकट होते. यामुळे कंपनीच्या वाढत्या निर्यात व्यवसायालाही पाठबळ मिळेल.

जबाबदार उत्पादनाप्रती असलेल्या सीजीच्या वचनबद्धतेनुसार उभारलेल्या या सुविधेमध्ये ऊर्जा-कार्यक्षम प्रणाली, पर्जन्यजल संचयन आणि जल पुनर्वापर पायाभूत सुविधा, आणि शून्य द्रव विसर्जन कार्यप्रणाली यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे संसाधनांची कार्यक्षमता सुधारेल, तसेच ऊर्जेचा वापर आणि पर्यावरणावरील परिणाम कमी होईल अशी अपेक्षा आहे.

सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेडचे ग्रुप सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक अमर कौल म्हणाले, ''एस३ युनिट- ची सुरुवात हा आमच्या विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच, ग्रीडचा विस्तार, अक्षय्य ऊर्जेचा समावेश आणि पायाभूत सुविधांचा विकास यातून निर्माण होणाऱ्या संधींबाबतचा आमचा आत्मविश्वास यातून दिसून येतो. भारत आणि जागतिक बाजारपेठांमध्ये उच्च-व्होल्टेज ट्रान्समिशन उपकरणांची मागणी वाढत असतानाच या सुविधेमुळे मोठ्या प्रमाणावर जागतिक दर्जाची उत्पादने पुरवण्याची क्षमता आम्हाला मिळते. नावीन्य, गुणवत्ता आणि उत्कृष्ट कार्यपद्धतीद्वारे ग्राहकांच्या बदलत्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला ही गुंतवणूक अधिक बळकट करते.''

## निसर्ग व पर्यावरण संवर्धनासाठी स्वामी सद्गुरू हायटेक नर्सरीने मोलाचे योगदान द्यावे - ॲड. सचिन जगताप

### आयुर्वेद चौक, अमरधाम रोड येथे स्वामी सद्गुरू हायटेक नर्सरीचा शुभारंभ उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. नागरिकांमध्ये वृक्षांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार व्हावा आणि प्रत्येक घरापर्यंत हिरवाई पोहोचावी या उद्देशाने आयुर्वेद चौक, अमरधाम रोड येथे सुरू करण्यात आलेल्या स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ आयुर्वेद शास्त्र शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी बोलताना ॲड. सचिन जगताप म्हणाले की, आजच्या घडीला शहरांमध्ये हरित क्षेत्राचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. वाढते नागरीकरण, काँक्रीटीकरण आणि पर्यावरणातील बदल यामुळे वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना वृक्षांचे महत्त्व समजून देण्यासाठी आणि वृक्षारोपणाची आवड निर्माण करण्यासाठी आधुनिक सुविधांनी युक्त हायटेक नर्सरीची आवश्यकता आहे. या नर्सरीमध्ये सर्व प्रकारची फळझाडे, देशी वृक्ष, फुलझाडे तसेच पर्यावरणपूरक विविध रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांना केवळ रोपे खरेदीच करता येणार नाहीत, तर निसर्गाचा आनंद घेत पर्यावरण संवर्धनाची प्रेरणाही मिळणार आहे.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू झालेली ही नर्सरी भविष्यात पर्यावरण जनजागृतीचे केंद्र ठरेल. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची सवय नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीने पुढाकार घ्यावा. निसर्ग आणि पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या नर्सरीकडून अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नर्सरीचे संचालक मोहन गुंजाळ, दिलीप उरमोडे, गौरव उरमोडे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक कुमारसिंग वाकळे, सुरेश बनसोडे, मनोज कोतकर, दत्ता गाडळकर, बाली बांगरे, संभाजी पवार, पैलवान बंटी गुंजाळ, अनिल गुंजाळ, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, भरत पवार, केशव चेमटे, सचिन गुंजाळ, पांडुरंग गुंजाळ, सुनील गुंजाळ, उद्धव गुंजाळ, विशाल नगरे, अमित तवले आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थितांना जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देत वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. ते म्हणाले की, वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण देण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर घडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीच्या माध्यमातून नगरकरांना विविध जातींची झाडे, फळझाडे आणि शोभिवंत रोपे सहज उपलब्ध होणार असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला निश्चितच बळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# एआय तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी वृक्षारोपण व संवर्धनाशिवाय पर्याय नाही - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

**पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा शुभारंभ; विद्यार्थ्यांमार्फत राबविणार वृक्ष दत्तक योजना जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका व श्री साई द्वारका सेवा ट्रस्टचा उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होत असून त्याचा परिणाम थेट मानवी जीवनावर होताना दिसत आहे. वाढते तापमान, अवेळी पाऊस, बदलणारे हवामान आणि घटत चाललेली हरित संपदा ही चिंतेची बाब बनली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत अहिल्यानगर महानगरपालिका आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा' शुभारंभ जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पटांगणात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करताना सांगितले की, सन १९९२ पासून आपण वृक्षारोपणाच्या अनेक मोहिमा पाहत आणि वाचत आलो आहोत. मात्र मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जात असली तरी त्यांचे संवर्धन होताना फारसे दिसत नाही. त्यामुळेच यावर्षी अहिल्यानगरमध्ये तब्बल ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

ते पुढे म्हणाले की, शहरांमध्ये वाढणारे काँक्रीटीकरण, रस्त्यांचे जाळे आणि झपाट्याने कमी होणारे हरित क्षेत्र यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा आहे, त्या ठिकाणी तापमान तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. पुढील पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध निसर्ग मिळावा यासाठी वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे.

''हे एकट्या-दुकट्याचे काम नाही. वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी लोकचळवळ उभी राहणे आवश्यक आहे. विशेषतः युवा पिढीने पुढे येऊन या मोहिमेचे नेतृत्व करणे गरजेचे आहे. वाढदिवस, सामाजिक कार्यक्रम, उत्सव आणि इतर शुभ प्रसंगी वृक्षारोपण करण्याची सवय समाजात रुजली पाहिजे,'' असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमध्ये लाखो विद्यार्थी घडले असून समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. याच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आता 'विद्यार्थी वृक्ष दत्तक योजना' राबविण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारल्यास भविष्यात शहरात मोठ्या प्रमाणावर हरित क्षेत्र निर्माण होऊ शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

''आज कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती होत असली तरी शुद्ध हवा, ऑक्सिजन, पाऊस आणि पर्यावरणीय संतुलन यासाठी वृक्षांनाच पर्याय नाही. एआय मानवी जीवन सुलभ करू शकते, मात्र निसर्गाची जागा घेऊ शकत नाही. त्यामुळे एआय तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी वृक्षारोपण आणि संवर्धनाशिवाय पर्याय नाही,'' असे परखड मत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी व्यक्त केले.

यावेळी त्यांनी सांगितले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत एक लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या मोहिमेत नगरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनासाठी योगदान द्यावे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहर लहारे, संस्थेच्या खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, अनिल आठरे, प्रा. हर्षल आगळे, इंजि. कैलास दिघे, राजेंद्र पवार, प्रा. गणेश निमसे, प्रा. भरत होळकर, संतोष कानडे, सुरेश खामकर, अमित खामकर, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, मल्हार गंधे, प्रा. भगवान कुंभार, राजू पाटील, जगन्नाथ साबळे, रवींद्र वर्पे, तुळशीराम पालीवाल, डॉ. अशोक काळे, नितीन धांडे, कारभारी गायकवाड, अजित कटारिया यांच्यासह शिक्षक, पालक, एनसीसीचे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा

**मंदिरातील धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला । विहिंपचे मंदिर एवम अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना निवेदन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मंदिरेही हिंदू समाजाची शक्ती केंद्र आहेत.मंदिरांना शेकडो वर्षांपूर्वी समाजहित,धार्मिक परंपरा, नित्य पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी इनामी जमिनी देण्यात आल्या होत्या.या जमिनी केवळ मालमत्ता नसून हिंदू समाजाच्या श्रद्धा,परंपरा आणि धार्मिक व्यवस्थेचा आधार आहेत. प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा.या मागणीचे निवेदन विहिंप चे मंदिर एवम अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने राहुरी,नगर,पाथर्डी मतदार सघाचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना देण्यात आले.

याप्रसंगी मंदिर एवम अर्चक,पुरोहित आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे,जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,जिल्हा सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,मनोहर भाकरे,हभप काळे महाराज,डॉ.वसंत झेंडे, दिनेश परदेशी आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला ''मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा'' हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा संपूर्णतः रद्द करून नवीन तज्ञ समितीमार्फत व्यापक अभ्यासानंतर नवीन प्रारूप तयार करण्यात यावे, मंदिरांच्या मालमत्ता, परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेचे संरक्षण करणारी स्पष्ट तरतूद करण्यात यावी.अशी ठाम मागणी महाराष्ट्रातील विविध देवस्थानांनी आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे करण्यात येत आहे.

# पाटेगावजवळ गोदावरी नदीपात्रात वाळूचे ढिगारे; कारवाई कधी होणार?



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील पाटेगाव येथील गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करून नदीच्या मध्यभागीच वाळूचे ढिगारे साठविण्यात आल्याचे चित्र समोर आले आहे. पोकलेनच्या साहाय्याने वाळू उपसा होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात असून याकडे महसूल, पोलीस व खनिकर्म विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

नदीपात्रात ठिकठिकाणी वाळूचे मोठे साठे दिसून येत असून या प्रकारामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पर्यावरणीय हानीबरोबरच पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात, अशी भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिकांच्या मते, दिवसाढवळ्या वाळू उपसा सुरू असताना संबंधित यंत्रणा मात्र मुग गिळून गप्प बसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अवैध वाळू उपशाला कुणाचे अभय आहे का, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, नदीपात्रातील वाळू साठ्याची तातडीने पाहणी करून उपसा कायदेशीर आहे की बेकायदेशीर याची चौकशी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. ''कारवाई कधी होणार?'' हा प्रश्न सध्या नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

## जाहीर नोटीस

**मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात....**
**आरटीएस अपील अर्ज नं. २२९/२०२५**

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज. मु.
सचिन रामनाथ कासार
विरूध्द
रेस्पॉंडंट
भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,
१) अनिता राजेंद्र माहुरकर, रा. घ. नं. २५५४, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर
२)सुरेखा सुहास रामचंद्रे
रा. सराफ कट्टा, मु. पो. सांगली, जि. सांगली
३) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण
४) निर्मला रमेश पानपट
५) रंजना प्रकाश रासने
नं. ४ ते ६ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरूर कासार, ता. शिरूर कासार, जि. बीड
६)भारती रमेश थिटे, रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे, रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.
८) सिंधूबाई भोपाळराव बागवडे, रा. प्लॅट नं. ९, फेज नं. ३, वर्धमान कॉलनी, कोल्हापूर रोड, सांगली, जि. सांगली.

ज्याअर्थी यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील, भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. १०८/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरूध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उतरार्थी पक्षकार मचहणून सामील असून तुम्हास तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवून देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दि. २९/०६/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असून सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वत: अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे, आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास करून केल्यास आपल्या गैरहजेरीत आपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर

(पान १ वरून)

## विवेक कोल्हे यांच्यापाठोपाठ प्राजक्त तनपुरे यांचे भाजपकडून पुनर्वसन

भाजपने पुनर्वसन केले, त्याचप्रमाणे राहुरीत प्राजक्त तनपुरे यांचे पुनर्वसन झाले असून, जिल्ह्यातील मोठी राजकीय घराणे असलेल्या या कोल्हे व तनपुरे यांचे वारस पक्षात घेऊन भाजपने जिल्ह्यातील आगामी राजकारणाचा पाया अधिकच भक्कम केला आहे. दीड वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीवेळी कोपरगावमध्ये भाजपने मास्टरट्रोक मारून महायुतीतील राष्ट्रवादीचे आशुतोष काळे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा केला. त्यावेळी पुनर्वसनाचा शब्द देऊन विवेक कोल्हे यांना थांबवण्याची खेळी भाजपने खेळली. दीड महिन्यापूर्वी राज्यपाल नियुक्त आमदार म्हणून विवेक कोल्हे यांची वर्णी लावण्यात आली. त्यामुळे कोपरगावला दोन आमदार मिळाले, तर हीच खेळी भाजपने राहुरीतही खेळून मतदारसंघ भाजपमय केला आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे प्राजक्त तनपुरे आणि त्यांचे समर्थक काहीसे बॅकफूटवर गेले होते. मतदारसंघात राजकीय सुप्तता निर्माण झाली होती. मात्र, आता थेट आमदारकी मिळाल्याने तनपुरे यांचे दणक्यात राजकीय पुनर्वसन झाले आहे. या निर्णयामुळे मरगळ आलेल्या कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळाले असून, संपूर्ण मतदारसंघात उत्साहाचे वातावरण आहे.

### काळे-कोल्हे संघर्षात कोल्हे गटाचा पुनर्जन्म

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

दुसरीकडे, मागील निवडणुकांमध्ये पराभव पत्करावा लागलेल्या आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपात तडजोड स्वीकारत माघार घेणाऱ्या कोल्हे कुटुंबाचा भाजपने अखेर योग्य सन्मान केला आहे. भाजपचे युवा नेते विवेक कोल्हे यांना विधानपरिषदेची आमदारकी देण्यात आल्यामुळे कोल्हे गटाच्या कार्यकर्त्यांना 'नवसंजीवनी'मिळाली आहे.

सततच्या पराभवानंतर झाले राजकीय पुनर्वसन
कोपरगाव मतदारसंघात नेहमीच काळे आणि कोल्हे या दोन्ही मातब्बर गटांमध्ये, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये 'काँटे की टक्कर' पाहायला मिळते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत स्नेहलता कोल्हे यांनी अशोकराव काळे यांचा पराभव केला आणि त्या आमदार झाल्या. मात्र, त्यानंतरच्या काळात कोल्हे गटाला अनेक राजकीय धक्के आणि पराभवाचा सामना करावा लागला.२०१६ च्या नगरपरिषद निवडणुकीत बहुमत मिळूनही नगराध्यक्षपद हातातून गेले. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही कोल्हे गटाला अपयश आले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत स्नेहलता कोल्हे यांचा अवघ्या ८०० मतांनी पराभव झाला.२०२४ मध्ये शिक्षक मतदारसंघातून विवेक कोल्हे यांना यश आले नाही, तसेच विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या राजकीय गणितांमुळे त्यांना थांबण्याचा सल्ला देण्यात आला. सततच्या या राजकीय पराभवांमुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड निराशा पसरली होती. मात्र, २०२६ मध्ये भाजपने विवेक कोल्हे यांना विधानपरिषदेची आमदारकी बहाल करत मोठा मास्टरस्ट्रोक खेळला. यामुळे मरगळलेल्या कार्यकर्त्यांना एक प्रकारे नवीन ऊर्जा मिळाली असून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका पाहता, कोपरगावचे राजकीय चित्र बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य समाजाला प्रेरणा, ऊर्जा देणारे - महापौर ज्योतीताई गाडे

धर्मांचा आदर राखत सुशासन निर्माण करणे हा शिवरायांच्या राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. त्यामुळेच आजही त्यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आदर्श मानले जाते.

त्या पुढे म्हणाल्या की, रायगड किल्ल्यावर पार पडलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हा केवळ एका राजाचा राज्याभिषेक नव्हता, तर तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा, आत्मसन्मानाचा आणि स्वातंत्र्याच्या विचारांचा विजय होता. राज्याभिषेकामुळे मराठी अस्मितेला नवे बळ मिळाले आणि स्वराज्याची संकल्पना अधिक मजबूत झाली. शिवरायांनी उभे केलेले स्वराज्य हे न्याय, समानता, शौर्य आणि लोकहित या मूल्यांवर आधारित होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजाला नवी दिशा देणारे आहे. महापौर ज्योतीताई गाडे यांनी राज्याभिषेक दिनानिमित्त नागरिकांना शुभेच्छा देताना सांगितले की, शिवरायांचा इतिहास केवळ स्मरणात ठेवण्याचा नसून तो आपल्या आचरणात आणण्याची गरज आहे. समाजहित, राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवा ही मूल्ये अंगीकारूनच शिवरायांना खरी आदरांजली वाहता येईल.यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर यांनी राज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देताना छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सन्मानासाठी घेतलेल्या भूमिकेचे स्मरण केले. त्यांच्या राज्यकारभारातील लोककल्याणकारी निर्णय आजही प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.
उपसभापती वर्षाताई सानप यांनी देखील राज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देत शिवरायांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान आणि स्वराज्याच्या स्थापनेसाठी केलेला संघर्ष याचे स्मरण केले. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारे राज्य निर्माण करण्याची शिकवण शिवरायांच्या कार्यातून मिळते, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात अभिवादन केले.

## नगरचे ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांचे निधन

उपचार सुरू होते. त्या उपचारांमुळे त्यांची प्रकृती बर्यापैकी सुधारली होती. मात्र, नंतर हृदयविकाराचा सौम्य झटका आल्याने त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना त्यांचे ब्रेन डेड झाले आणि आज दुपारी सव्वा दोनच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी बालिकाश्रम रस्त्यावरील रेडिओ नगर येथे काही वेळ ठेवण्यात आला होता. त्यानंतर सायंकाळी शोकाकूल वातावरणात अमरधाममध्ये अंत्यविधी करण्यात आला.

नगरचा चालताबोलता इतिहास
भूषण देशमुख हे मूळचे जामखेड येथील होते. टेक्सटाईल इंजिनिअरिंगचे शिक्षण त्यांनी घेतले होते. कापड निर्मिती कंपनीत काहीकाळ नोकरीही त्यांनी केली. मात्र, लिखाणाची आवड असल्याने त्यांनी ती नोकरी सोडून पत्रकारितेत प्रवेश केला. सुरुवातीला दैनिक केसरीमध्ये त्यांनी उपसंपादक म्हणून काम केले. त्यानंतर दैनिक लोकसत्ता व दैनिक दिव्य मराठी या दैनिकांतूनही त्यांनी विविध संपादकीय जबाबदार्या सांभाळल्या. याच दरम्यान, शहराच्या व जिल्ह्याच्या इतिहासाच्या अभ्यासात त्यांनी रुची घेतली. पुढे पत्रकारितेतून निवृत्त झाल्यावर इतिहास अभ्यासाची ही गोडी त्यांचे जीवनध्येय झाले. निजामी इतिहासाचे गाढे अभ्यासक म्हणून ते राज्यात प्रसिद्ध होते. नगरच्या इतिहासाची ओळख करून देणारा हेरिटेज वॉक हा उपक्रम गेली अनेक वर्षे ते उत्साहाने चालवत होते. याअंतर्गत नगर शहर व जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांवर मुलांच्या व इतिहास प्रेमींच्या सहली नेऊन त्यांना शहराच्या समृद्ध इतिहासाची माहिती ते देत असत. अहिल्यानगर महापालिकेने त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. शहराच्या पर्यटनावर व इतिहासावर त्यांनी पुस्तकेही लिहिली आहेत. स्नेहालयाच्या ९०.४ एफएम रेडिओचे ते अनेक वर्ष संचालक होते. या रेडिओच्या माध्यमातून त्यांनी अनेक इतिहास व शिक्षण तज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या. अहिल्यानगरच्या मातीचा, संस्कृतीचा आणि गौरवशाली इतिहासाचा सखोल अभ्यास भूषण देशमुख यांचा होता. ऐतिहासिक संदर्भांचा अभ्यास, स्थानिक इतिहासाविषयीची तळमळ आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यांच्या निधनाने पत्रकारिता, इतिहास संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे.

## पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेतील दिरंगाई!

प्रशासनाच्या उदासीनतेमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणीच्या वेळी तत्परतेने धाव घेऊन प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणारी आमदार काशिनाथ दाते सरांची कार्यशैली यावेळी पुन्हा एकदा दिसून आली. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे संबंधित प्रक्रिया वेगाने मार्गी लागली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष प्रितेश पानमंद यावेळी उपस्थित होते. जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे, हीच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाची खरी ओळख असल्याची भावना यावेळी नागरिकांमधून व्यक्त करण्यात आली.

### गोदावरी महामंडळ कार्यालय स्थलांतराचा विखेंचा 'बालहट्ट'

अनेक प्रश्न प्रलंबित असताना विकासकामांऐवजी कार्यालयांचे स्थलांतर करण्यावर भर दिला जात असल्याची टीका करताना त्यांनी जिल्ह्यातील विकासाच्या असमतोलावरही प्रश्न उपस्थित केले. पंतप्रधान आले तर शिर्डीत, गृहमंत्री आले तर शिर्डीत आणि संरक्षणमंत्री आले तर लोणीत येतात. मग कर्जत, जामखेड, पारनेर आणि इतर भागांकडे दुर्लक्ष का केले जाते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संरक्षण विभागाच्या जमिनी उपलब्ध असतानाही त्या परिसरात संरक्षणविषयक उद्योग किंवा प्रकल्प न आणल्याचा आरोप करत त्यांनी राहुरी-ढवळपुरी परिसरातील युवकांच्या रोजगाराच्या संधींकडे दुर्लक्ष झाल्याचे म्हटले. अहिल्यानगरसाठी स्वतंत्र विमानतळाची मागणीही त्यांनी यावेळी पुन्हा केली. शिर्डी विमानतळाला विरोध नसल्याचे स्पष्ट करताना नगरसाठी पूर्वी पिंपळगाव माळवी येथे विमानतळाचा प्रस्ताव होता, त्याचा पुनर्विचार करून उद्योग, व्यापार आणि दळणवळणाला चालना देणारे पाऊल उचलावे, अशी मागणी त्यांनी केली. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयाच्या प्रस्तावित स्थलांतराचाही त्यांनी उल्लेख केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र देऊन अहिल्यानगर हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे एक महत्त्वाचे कार्यालय येथेच कायम ठेवण्याची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना लंके म्हणाले की, पक्षाने तयारी करण्यास सांगितल्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी केली होती. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे अर्ज दाखल करता आला नाही. महाविकास आघाडीत काँग्रेसकडे सर्वाधिक मतदारसंख्या असल्याने उमेदवारी त्यांच्याकडे देण्याचा निर्णय झाला. महाविकास आघाडीत कोणताही विसंवाद नसून आपण पक्षाचे आदेश मानणारे कार्यकर्ते असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.